मराठवाडा नेता दि. 1.11.25

# स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची धडक कारवाई

## टायर बोर्ड येथून ९ गोवंश जातीच्या जनावरांची सुटका



नांदेड : (म नेता) देगलूर परिसरातील टायर बोर्ड येथे स्थायिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना धाड टाकून ९ गोवंश जातीच्या जनावरांची सुटका केली असून तीन जणांविरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांचे सहकारी गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, टायर बोर्ड येथे दोन वाहनातून गोवंश जातीच्या जनावरे कत्तल करण्यासाठी नेत आहेत. सदर हकीगत पोलिस उपनिरीक्षक महेश कोरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या कानावर घालून देगलूर नाका भागातील टायर बोर्ड येथे धाव घेऊन एम एच ०२ एफ जी ०९७८ व एम एच बी ई ४१३४ क्रमांकाच्या बलोरो पिक अप यांना थांबवून त्यांची चौकशी केली.

त्यावेळी सदर बलोरो पिक अप मध्ये गोवंश जातीची ९ जनावरे आढळून आली. पोलिस उपनिरीक्षक महेश कोरे यांनी शेख शफी सोहेल रफिक कुरेशी, नजीर बशीर कुरेशी, महमंद रिझवान कुरेशी यांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात पोलिस कर्मचारी श्रीराम दासरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, पोलिस उपनिरीक्षक महेश कोरे व पोलिस कर्मचारी श्रीराम दासरे, माधव माने, सुधाकर देवकते यांनी केली आहे.

…नार, माधव पावडे, … आड योगेश पवार यांच्यासह आदींची …च्या उपस्थितीत मुख्य चौरस्ता ते… उपस्थिती होती.